प-२२

अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज.)
यांचे कार्यालय, पुणे महानगरपालिका.
जा.क्र.: अतिमआ (ज.)/एलओ/ ४६४४
दिनांक: १४/०१/२०२१

## – कार्यालय परिपत्रक –

**विषय :** दिनांक १४ जानेवारी ते दिनांक २८ जानेवारी २०२१ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करणेबाबत.

संदर्भ : मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज.) ठ.क्र.८/३९३ दि.१४/०१/२०२१

पुणे महानगरपालिका मराठी भाषा संवर्धन समितीमार्फत दिनांक १४ ते २८ जानेवारी, २०२१ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने पुणे महानगरपालिकेतील अधिकारी/ कर्मचाऱ्यांसाठी पुढीलप्रमाणे स्पर्धा आयोजित करण्यात येत आहेत.

| क्र. | स्पर्धेचे नाव | विषय | दिनांक | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | सुंदर हस्ताक्षर | -- | २८/१/२१ | स. ११ ते ११.३० वा. | श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृह (जुने ), पुणे महानगरपालिका भवन, तिसरा मजला |
| २ | कथा लेखन | शब्द मर्यादा – जास्तीत जास्त २०० शब्द (२०० शब्दांपेक्षा जास्त असलेली कथा अपात्र ठरविण्यात येईल.) | २८/१/२१ | दु. १२ ते १२.३० वा. | |
| ३ | निबंध (किमान ५०० शब्द) | कामकाजात १००% मराठीचा वापर करण्यातील अडचणी व उपाय | २८/१/२१ | दु. ०१ ते २.०० वा. | |
| ४ | वक्तृत्व | अलीकडे मराठीचा वाढलेला वापर | २८/१/२१ | दु.०३.००वा. | |

उपरोक्त स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम क्रमांक र.रू. **३,००१/-,** द्वितीय क्रमांक र.रू.**२,००१/-** व तृतीय क्रमांक र.रू. **१,००१/-** याप्रमाणे पारितोषिक धनादेश/आरटीजीएसद्वारे आदा करण्यात येणार आहे. सर्व स्पर्धा या मराठी भाषेतून घेण्यात येणार आहेत. तसेच श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृह (जुने), पुणे महानगरपालिका येथे दिनांक २८/१/२०२१ रोजी सायंकाळी ४ वाजता कवीसंमेलन आयोजित करण्यात येणार आहे.

पुणे महानगरपालिकेतील सर्व इच्छुक अधिकारी/ कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज खात्यामार्फत कामगार कल्याण विभाग, दुसरा मजला, खोली क्र. २०८, मनपा मुख्य भवन, शिवाजीनगर, पुणे ५ येथे दि.२५/१/२०२१ अखेर दु.४.०० वाजेपर्यंत पाठविण्याची दक्षता घ्यावी.

तरी सर्व खातेप्रमुख यांनी त्यांचे नियंत्रणाखाली सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांना या कार्यालय परिपत्रकाची समज देण्यात यावी.

कळावे.

Rubal

(रूबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज.)
पुणे महानगरपालिका.

प्रत/-
सर्व मा. खातेप्रमुख/महापालिका सहाय्यक आयुक्त/विभाग प्रमुख,
पुणे महानगरपालिका.

यांजकडेस माहिती व पुढील तजविजीसाठी रवाना---

D:\MULUK\MARATHI BHASHA SANVARDHAN SAMITI\Marathi pandharwada21\ Marathi pandharwada 2021 nivedan